**प्रेसनोट** **दिनांकः-१४/०५/२०१९.**

**विश्रामबाग पोलीस स्टेशन,पुणेशहर.**

**<u>पोलीसांच्या कर्तव्य तत्परतेमुळे महिलेची हरविलेली दुचाकी परत मिळाली.</u>**

दिनांक १३/०६/२०१९ रोजी महिला नामे प्रिया विक्रांत सालके, वय-४० वर्षे, राहणार-५०१, वेलवेट सिलेस्टीना, साखर संकुल जवळ, शिवाजीनगर,पुणे या कामानिमित्त मंडई परिसरांत आलेल्या होत्या. सदरवेळी त्यांनी मंडई पोलीस चौकीमध्ये समक्ष हजर होवुन त्यांची ॲक्टीव्हा दुचाकी क्रमांक-ग्क्त१२-ग़्च-३५४८ ही चोरीस गेलेबाबत सांगितले. सदरवेळी मंडई पोलीस चौकी येथे डयुटी अंमलदार म्हणुन कर्तव्यावर हजर असलेले पोलीस हवालदार श्री. संतोष विभुते यांनी सदर महिलेची तक्रार शांतपणे ऐकुन घेवुन त्यांचे दुचाकी वाहनाची सविस्तर माहीती घेतली. तसेच पोलीस हवालदार श्री. संतोष विभुते यांनी तातडीने मंडई परिसरांत पायी फिरुन महिला नामे प्रिया सालके यांचे वरनमुद ॲक्टीव्हा दुचाकी वाहनाचा शोध घेतला असता सदरची ॲक्टीव्हा दुचाकी ही मंडई परिसरातील कृष्ण भुवन या चहाच्या हॉटेल समोर उभी असलेली आढळुन आली. चौकशी दरम्यान वरनमुद महिला नामे प्रिया सालके या काही वेळापुर्वी मंडई येथील कृष्ण भुवन या हॉटेलमध्ये चहा पिण्यासाठी जातांना त्यांनी आपलेकडील वरनमुद ॲक्टीव्हा दुचाकी क्रमांक ग्क्त१२-ग़्च-३५४८ ही कृष्ण भुवन या हॉटेल समोर उभी करुन ठेवल्याचे व चहा पिऊन झाल्यावर त्या दुचाकी न घेता तशाच अन्य ठिकाणी तेथुन निघुन गेल्याचे हॉटेल चालक यांनी सांगितले. परंतु तद्नंतर आपली दुचाकी ही वरनमुद महिलेने चहाचे हॉटेल समोर उभी केल्याचे विसरुन आपली दुचाकी चोरीस गेलेबाबत तक्रार देण्यांस आलेल्या होत्या. परंतु **मंडई चौकीचे पोलीस हवालदार श्री. संतोष विभुते यांनी सदरवेळी दाखविलेल्या कार्यतत्परतेमुळे नमुद महिलेची ॲक्टीव्हा दुचाकी चोरीस गेलेली नसल्याचे निष्पन्न होवुन काही वेळातच प्रिया सालके यांना त्यांची वरनमुद दुचाकी परत मिळालेली असुन सदर बाबत महिलेने पोलीसांचे आभार मानले.**

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
विश्रामबाग पोलीस ठाणे,पुणेशहर.